**MANAGEMENT COUNCIL**
**23rd AUGUST, 2023**

विषय क्र.२५ - दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्रामार्फत विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे वेब पोर्टलवर ऑनलाइन पध्दतीने भरावयाचा सन २०२२-२३ चा अंतर्गत गुणवत्ता हमी केंद्राचा (CIQA) तयार केलेला वार्षिक अहवाल विचारार्थ.

(सोबत वार्षिक अहवालाची प्रत सॉफ्ट कॉपी मध्ये जोडली आहे.)

(टिपणी: विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी दि. १२ जुलै २०२३ रोजीच्या ई-मेलनुसार UGC DEB वेब पोर्टलवर Centre for Internal Quality Assurance (CIQA) चा सन २०२२-२३ चा वार्षिक अहवाल सादर करण्याची तारीख दि. ३१ ऑगस्ट २०२३ पर्यंत असल्याचे कळविले आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या नमुन्यात या केंद्रामार्फत माहिती भरण्यात आली असून सदरचा तयार केलेला वार्षिक अहवाल अंतर्गत गुणवत्ता हमी केंद्राच्या दि. १०/०८/२०२३ रोजी झालेल्या बैठकीत सादर केला असता त्यावर सदरचा वार्षिक अहवाल मान्य करून व्यवस्थापन परिषदेस अंतिम मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली असा ठराव झालेला आहे.

सबब, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे वेब पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने भरावयाचा सन २०२२-२३ चा अंतर्गत गुणवत्ता हमी केंद्राचा (CIQA) तयार केलेला वार्षिक अहवाल विचारार्थ.)

ठराव : **दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे वेब पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने भरावयाचा सन २०२२-२३ चा अंतर्गत गुणवत्ता हमी केंद्राचा (CIQA) तयार केलेला वार्षिक अहवाल दुरूस्तीसह मान्य करण्यात आला.**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
सभा व निवडणूका विभाग
Shivaji University, Kolhapur